दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५० वा | गुरुवार दि. ६ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## खोट बोलून शरद पवारांना बदनाम करू नका : आव्हाड

**मुंबई ।** मुंबईत सभेला संबोधित करताना अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्यावरही अप्रत्यक्षपणे टीकास्त्र



सोडले. दुसरीकडे अजित पवारांच्या आरोपाला जितेंद्र आव्हाडांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. मला जे बोलायचे ते बोला, पण साहेबांवर जे काही बोलला आहात, त्यांच्याविरोधात मी उभा आहे. खोटं बोलून शरद पवारांना बदनाम करू नका, त्यांना लोकांपासून दूर ठेवण्यासाठी काही लोकांनी रचलेले षडयंत्र आहे, असा आरोप जितेंद्र आव्हाडांनी केला आहे.

## न्यूज कॉलम

### चंदननगरात धाडसी घरफोडी; दागिने लंपास

**धुळे ।** देवपूर परिसरातील चंदननगरात चोरट्याने धाडसी घरफोडी करीत घरातील रोकडसह दागिने मिळून एकूण ३३ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. पुनम रविदास जसेकर या महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार,त्यांच्या घरात प्रवेश करून घरातील १९ हजारांच्या रोकडसह सोन्याचांदीचे दागिने मिळून एकूण ३३ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**धुळे ।** ओव्हरटेक करणार्या ट्रकने धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुण ठार झाल्याची घटना तरवाडे गावाजवळ घडली. धुळे ते चाळीसगाव रोडवर तरवाडे गावानजीक पोलिस चौकीजवळ पुढे चालणार्या वाहनास ओव्हरटेक करताना ट्रकने (यूपी १६, जेटी ३१८३) समोरुन येणारी दुचाकीला (एमएच १८, बीवाय ३१६५) धडक दिली. त्यात दुचाकीस्वार विजय शिवाजी जाधव (वय १९, रा. बेहराबर्डी, चाळीसगाव) हा गंभीर जखमी झाल्याने जागीच ठार झाला.

# राष्ट्रवादीच्या अध्यक्ष पदावर अजित पवारांचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षे तुम्ही राजकारण करत आहे. आता ८० वर्षाचे झाले. नवीन नेतृत्वाला संधी मिळाली पाहिजे. आता तुमचे वय झाले आहेत. तुम्ही कधी थांबणार आहे की की नाही? असा सवाल अजित पवारांनी शरद पवारांना केला आहे. भाजपसोबत जायचे नव्हते तर आम्हाला पाठवले का? मी खोटे बोलत नाही आणि खोटे बोलले तर पवारांची औलाद सांगणार नाही,असे म्हणत अजित पवारांनी मोठे गौप्यस्फोट केला. २०१९ मध्ये भाजपसोबत पाच बैठका झाल्याचा खुलासा अजित पवारांनी केला आहे.

२०१४ साली वानखेडे स्टेडिअमवर देवेंद्र फडणविसांच्या शपथविधीला आम्हाला जायला सांगितलं जर त्यांच्यासोबतच जायचं नव्हतं तर का तिथे आम्हाला पाठवलं. २०१७ लाही असाच प्रयत्न झाला होता. वर्षा बंगल्यावर बैठक झाली होती. राष्ट्रवादीकडून अजित पवार, जयंत पाटील, सुनिल तटकरे आणि छगन भुजबळ उपस्थित होते. भाजपकडून सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. तेव्हा भाजप म्हणाले, आम्ही २५ वर्षं शिवसेनेसोबत होतो आणि आम्ही त्यांची साथ सोडणार नाही. त्यांनंतरही देवेंद्र फडणवीस आणि माझ्यात पाच बैठका झाल्या. मात्र आम्हाला सांगण्यात आलं की बाहेर काहीच बोलायचं नाही, असे अजित पवार म्हणाले.

ही वेळ आपल्यावर का आली, शरद पवार हे आपले श्रद्धास्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराजाचे स्वराज्य आपल्याला तयार करता आले पाहिजे, असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले. वसंत पाटील यांचे सरकार बाजूला सारले आणि सरकार स्थापन केले. शरद पवारांनी अनेक पक्ष काढले आणि त्यांना लोकांनी राज्याच्या राजकारणात योग्य स्थान दिले. १९८६ ला समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलिन केले, त्यांनापद मिळाले नाही, पण त्यानंतर मुख्यमंत्रीपद मिळाले. केंद्रात मंत्रिपद मिळाले. १९७८ पासून शरद पवारांनी लोकांनी साथ दिली आहे. प्रत्येकांचा एक काळ असतो असे म्हणत अजित पवारांनी मोठे विधान केले आहे. अजितदादांनी विलिनिकरणांचा इतिहास सांगितला आहे.मी कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही असे म्हणत शरद पवारांना अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

सोनिया गांधी परदेशी असल्याचा मुद्दा पुढे करण्यात आला आणि काही दिवसांनी त्यांच्यासोबत काम केले असे सांगताना अजित पवार सांनी शरद पवार यांचा राजकीय प्रवास सांगत खोचक टोला लगावला आहे.२००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला संधी आली होती तेव्हा मुख्यमंत्रीपद सोडण्यात आले नाहीतर आज राष्ट्रवादी काँग्रेसचा मुख्यमंत्री राज्यात राहिला असता. २०२२ वेळाही संधी आपण सोडली असा टोलाही त्यांनी लगावला.



### पवार साहेब आमचे विठ्ठल आहेत : छगन भुजबळ

पावर साहेब आमचे विठ्ठल आहेत, पण त्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलंय असं विधान छगन भुजबळ यांनी एमईटी येथे बोलताना केले आहे. हे सर्व का झाल? साहेब आमचे विठ्ठल आहेत. पण त्या विठठलाला बडव्यांनी घेरलेलं आहे. साहेबांनी त्यांना बाजूला करुन आम्हांला आशीर्वाद द्यावा, असे भुजबळ म्हणाले.

### तुम्ही कधी थांबणार आहात की नाही : अजित पवारांचा शरद पवारांना सवाल

### मी खोटं बोलणार नाही

मी कधी खोटं बोलणार नाही, खोटे बोलेल तर मी पवारांची औलाद असल्याचे सांगणार नाही म्हणत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसोबत राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांनी चर्चा केली. पण मला सांगण्यात आले कुणाला काही सांगायचे नाही असे सांगून मला शासंत केले. २०१७ ला शिवसेना जातीयवादी वाटत होती म्हणून भाजपसोबत न जाण्याची भूमिका मोठ्या नेत्यांनी घेतली आणि नंतर शिवसेनेसोबत जात भाजप जातीयवादी कसे वाटले. मी उद्धव ठाकरेंना सांगितले होते की शिवसेनेत नाराजी आहे, पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, असा दावाही त्यांनी केला आहे.

### राजीनामा मागे घ्यायचा होता तर दिला कशाला?

अजित पवारांनी शरद पवारांवरच निशाणा साधला. ते म्हणाले की, अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घ्यायचा होता, तर दिला कशाला, असा सवाल अजित पवार यांनी केला. अजित पवार म्हणाले, ६० वर्षे झाल्यानंतर शेतकरी मुलाला सांगतो, तू २५ वर्षांचा झालाय. तू शेती बघायची मी तुला सल्ला देईल. उद्योगपतींचीही ती पद्धत आहे. सुप्रियाशी बोललो, सुप्रिया आपण एका घरातले आहोत, एका कुटुंबातले आहोत, काहीतरी सांग, ते हट्टी आहेत. ते ऐकत नाहीत कुणाचे. असला कसला हट्ट आहे. खरंच आदर करतो आम्ही. काही आमदारांना बोलून घेतलं जातं. त्यांच्या पत्नीला फोन केला जातो. भावनिक केलं जातं.

### अजित पवारांचा राष्ट्रवादी पक्षावर दावा

अजित पवार विरूद्ध शरद पवार आता लढाई निवडणूक आयोगात पोहोचली आहे. दोन्ही गटांकडून निवडणूक आयोगात अर्ज करण्यात आले आहेत. अजित पवार यांनी या अर्जातून पक्षावर दावा सांगितला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगात अर्ज दाखल केल्यानंतर अजित पवार यांच्या गटाच्या वतीने पक्ष आणि पक्ष चिन्हावर दावा करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

# घड्याळ चिन्ह जाणार नाही, जाऊ देणार नाही: शरद पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

आज अनेकांनी वेगळी भूमिका घेतली, त्याबद्दल माझं काही मत नाही, पण पक्षाच्या ज्या कार्यकर्त्यांनी निवडून दिलं त्यांना विश्वासात न घेता वेगळी भूमिका घेतली गेली असं राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले. काही केलं तर पक्ष आणि चिन्ह जाणार नाही, ते जाऊ दिलं जाणार नाही असा ठाम विश्वास शरद पवारांनी दिला. जे लोक माझा फोटो वापरतात त्यांना माहिती आहे त्यांचं नाणं चालणार नाही असाही टोला त्यांनी अजित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लगावला.

जे माझा फोटो लावतात, त्यांना माहिती आहे की त्यांचं नाणं चालणार नाही असा टोला शरद पवारांनी अजित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर केला. मला पांडूरंग म्हणायचं आणि आमच्याकडे दुर्लक्ष केलं गेलं असं सांगायचं असा कार्यक्रम काहींनी सुरू केल्याचं ते म्हणाले. भोपाळच्या सभेमध्ये पंतप्रधानांनी राष्ट्रवादीला भ्रष्टाचारी म्हटलं, पण दोन दिवसांपूर्वी झालेल्या शपथविधीत राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना कशी शपथ दिली असा सवार राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर केली. विरोधकांना एकत्रित करण्याचं काम सुरू आहे, त्यामुळे पंतप्रधान अस्वस्थ झाल्याचंही ते म्हणाले. शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या वाटचालीबद्दल बोलताना म्हणाले की, आज राष्ट्रवादीच्या स्थापनेला २४ वर्षे पूर्ण झाली, या काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राष्ट्रवादीची फळी तयार केली. यामध्ये अनेकजण आमदार, खासदार आणि मंत्री झाले. राष्ट्रवादीने अनेक नवीन नेते तयार केले. राज्यातल्या शेवटच्या माणसापर्यंत कसं पोहोचायचं हा विचार होता.


लोकशाहीमध्ये विरोधी असो वा सहकारी असोत, त्यांच्यात सुसंवाद असावा लागतो. जो काही निर्णय घेतला जातो त्यावर सर्वसमान्यांची प्रतिक्रिया काय आहे हे जाणून घ्यावं लागतं. आज देशामध्ये हा संवाद नाही. देशातील विरोधक एकत्र येत असताना ज्यांच्या हातात सत्ता आहे ते अस्वस्थ होताना दिसत आहेत असं शरद पवार म्हणाले.

### पांडुरंग म्हणायचे अन् टीका करायची

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, काही लोकांचा आज मेळावा झाला. त्या मेळाव्याला माझा फोटो होता. गुरू म्हणायचे, पांडुरंग म्हणायचे. आणि माझ्याकडे दुर्लक्ष झाले असे म्हणत आरोप करायचा, याला काही अर्थ नाही. अशी टीका शरद पवार यांनी छगन भुजबळ यांच्यावर केली.

# शहरातील वाढीव घरपट्टी तत्काळ रद्द करावी! आ.शाह यांची अप्पर मुख्य सचिवांकडे मागणी

**धुळे । प्रतिनिधी**



शहरातील नागरिकांना आकारण्यात आलेली वाढीव घरपट्टी तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी आ.फारुख शाह यांनी नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्याकडे केली. तसेच वाढीव घरपट्टी कशी अन्यायकारक आहे याबाबत चर्चाही केली. दरम्यान, या मागणीची दखल घेत अप्पर सचिवांनी महापालिकेला वाढीव घरपट्टीसंदर्भात प्रस्ताव तयार करुन मंत्रालयात सादर करण्याबाबत आदेशीत केले असल्याची माहिती आ.शाह यांनी दिली आहे.

धुळे महापालिकेने शहरातील नागरिकांना आकारलेल्या वाढीव घरपट्टी संदर्भात आ. फारुख शाह यांनी थेट मंत्रालयात जावून नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता यांची भेट घेतली. तसेच त्यांना धुळे शहरातील परिस्थिती अवगत करून दिली. धुळे शहरात रोजगार नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. तसेच धुळे शहर हे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहे. वाढीव घरपट्टीमुळे शहरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. शहरात बेरोजगारी असल्यामुळे वाढीव घरपट्टी भरणे जिकरीचे होत आहे. तसेच शहराची हद्दवाढ झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर सामान्य नागरिकांवर वाढीव घरपट्टीचा बोजा पडत आहे. शहराच्या विकासासाठी शासनाचा निधी कमी पडत असल्यामुळे शहराचा हवा तसा विकास होत नाही. यापूर्वीही घरपट्टीत वाढ करण्यात आली होती, त्याचा बोजा आजपर्यंत नागरिक सहन करत आहे. दुसरीकडे सर्व कर घेऊन सुद्धा महापालिका सुविधा देण्यात असमर्थ ठरलेली आहे. तरी शहराची नागरिकांची परिस्थिती पाहता वाढीव घरपट्टी रद्द करून पूर्वीप्रमाणे घरपट्टी लागू करावी, अशी मागणी आ. शाह यांनी यावेळी केली. या मागणीला सकारत्मक प्रतिसाद देत असीम असीम गुप्ता यांनी धुळे महानगरपालिका यांना तात्काळ प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले असून लवकरच धुळेकर नागरिकांची वाढीव घरपट्टी पासून सुटका होईल, असे आ.फारुख शाह यांना श्री.गुप्ता यांनी आश्वासित केलेले आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नाशिक शहराध्यक्षपदी खैरे यांची फेरनिवड



**नाशिक । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी अंबादास खैरे यांची नाशिक शहराध्यक्ष पदावर फेरनिवड करण्यात आली असल्याची घोषणा काल मुंबई एज्युकेशन ट्रस्ट येथे झालेल्या बैठकीत केली.

अंबादास खैरे हे राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे नाशिक शहराध्यक्ष राहणार असून त्यांच्या फेरनिवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी दिले आहे. काल बांद्रा येथील मुंबई एज्युकेशन ट्रस्ट येथे पार पडलेल्या बैठकीवेळी ही घोषणा करण्यात आली. खैरे हे तिसऱ्यांदा युवक शहराध्यक्ष पदावर कायम राहत असून उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री छगन भुजबळ यांनी खैरे यांनी नाशिक शहरात केलेल्या कामांची पद्धत व पक्षवाढीकरिता घेतलेल्या निर्णयाची दखल घेत त्यांची युवक शहराध्यक्ष पदावर फेरनिवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

अंबादास खैरे यांची युवक शहराध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार पंकज भुजबळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खैरे यांचे अभिनंदन केले आहे. सामाजिक कार्यासोबत पक्षवाढीसाठी सक्रीय असलेल्या कार्यकर्त्यांना सुद्धा सोबत घेत असल्याचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी यावेळी सांगितले.

### मनसेचे नाशिककरांना साकडे

# 'अजूनही वेळ गेली नाही, पुन्हा एकदा राज ठाकरे यांना आजमावून बघा'




**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात सध्या सुरू असलेल्या घाणेरड्या राजकीय सिरीयलमुळे एकेकाळी देशाला दिशा दाखवणाऱ्या महाराष्ट्राची दैना झाली आहे. जनता आता या सर्व प्रकारास विटली असून २०१२ ते २०१७ मधील मनसेच्या नाशिक मनपातील सत्ताकाळातील विकासलक्षी कामांना आठवून आज जनता पुन्हा एकदा मनसेकडे आकर्षित होत असल्याचे राज्यातील चित्र आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक मनसेतर्फे काल राजगड कार्यालयाबाहेर अजूनही वेळ गेली नाही, पुन्हा एकदा राजसाहेब ठाकरे यांना आजमावून बघा असे बॅनर लावण्यात आले आहे. हे बॅनर आता नाशिककरांमध्ये चर्चेचा विषय बनले असून मनसेनेही शहरवासीयांना या माध्यमातून साद घालत राज ठाकरे यांना साथ द्यावी असे साकडे घातले असल्याचे दिसत आहे.

दरम्यान संपूर्ण नाशिक शहरात असे बॅनर लागणार असल्याची माहिती प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, नाशिक शहराध्यक्ष दिलीप दातीर, मनसे कामगार सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम मामा शेख यांनी दिली असून जनतेने सर्वांना आजमावून बघितले आहे. आता परत एकदा राज ठाकरे यांच्या हाती सत्ता द्या असे आवाहन केले आहे. याप्रसंगी मनसेचे प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, नाशिक शहराध्यक्ष दिलीप दातीर, मनसे कामगार सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम मामा शेख, उपजिल्हाध्यक्ष अनंत सांगळे, नाशिक शहर उपाध्यक्ष सचिन सिन्हा, अक्षय खांडरे, संतोष कोरडे, विभागाध्यक्ष सत्यम खंडाळे, धीरज भोसले, नितीन माळी, शहर सरचिटणीस मिलिंद कांबळे, ज्ञानेश्वर बगडे, हरीश गुप्ता, दिनेश विश्वकर्मा, गणेश मंडलिक, पंकज बच्छाव, हर्षल कुलकर्णी, धरम गोविंद व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंडखोरीच्या राजकारणाने राष्ट्रवादीत उडतो गोंधळ

राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार फोडून भाजपने एक वर्षापूर्वी शिवसेनेत फूट पाडली आणि उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रिपद घालविले. तसेच शिवसेनेतील आमदारांना बरोबर घेऊन नव्याने शिंदे-फडणवीस सरकार स्थापन केले. महाविकास आघाडीचे सरकार गेल्याने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्ष मजबूत ठेवत उद्धव ठाकरे यांनाही दिलासा देण्याचे काम केले. परंतु, एका वर्षातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्याच मदतीने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा फूट पाडून केवळ राष्ट्रवादीलाच नव्हे; तर संपूर्ण राज्याला आणि देशाला हादरा दिला. राष्ट्रवादीतच शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट पडले आहेत. मात्र, यामुळे वर्षानुवर्षे साहेब, ताई आणि दादांवर प्रेम करणाऱ्या निष्ठावंतांची मोठी अडचण झाली आहे. आपण नक्की कोणाचे आहे, हे कोणालाच सांगता येईना.

राष्ट्रवादी पक्षांची मुळात ओळखच एक अभेदय किल्ला अशी आहे. ज्यात बंडखोरी, दगा व फितुरीला कुठेही जागा नसल्याचा यापुर्वीचा अनुभव आहे. राष्ट्रवादीच्या बंडखोरीतून राज्याच्या राजकारणात असा काही कल्लोळ माजेल असे वाटले नव्हते. झालेल्या स्फोटाने राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मात्र हादरून गेला आहे. बंडखोरीविरुध्द कार्यकर्ता रस्त्यावर उतरला असला तरी आंदोलन कुणाविरुध्द व कुणासाठी करतो आहोत हे त्यास कळेनासे झाले आहे. राष्ट्रवादी अशापध्दतीने फुटू शकते यावर अजूनही कार्यकर्त्यांचा विश्वास बसत नाही आहे, घडलेल्या प्रकारावर त्याच्यामधून संताप व्यक्त होत आहे. पक्षात उभी फुट पडल्याने पक्ष संघटनासोबत राहायचं कि ज्यांच्या भरोश्यावर पक्षात त्यांची भिस्त आहे,अशा स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत राहायच या संभ्रमात कार्यकर्ते आहेत.

**शोध बातमी**
**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

### एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न

सर्व व्यवस्थित असताना आता राष्ट्रवादी पक्षात उभी फूट पडली व नेमकं आपसात भांडणं सुरू झाली एवढेच नाही तर प्रत्येक गटाला आपलं वर्चस्व दाखवून द्यायचा आहे. ताटात जेवणारे आता मात्र विभागला गेले आहेत व एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न होत आहेत. ष्ट्रवादीत पडलेल्या फुटीचे परिणाम राज्यातील विविध जिल्हा आणि तालुका पातळीवर उमटतांना दिसत आहेत. अशातच आता नाशिकमध्ये सुद्धा राष्ट्रवादीच्या फुटीचे परिणाम उमटल्याचे पाहायला मिळत आहे.



### सत्तेचे बाहुले होण्याची कार्यकर्त्यांना चिंता

राज्यातील पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. तर, काहींचा आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्ष प्रवेश होणार असल्याचे बोलले जात होते. मात्र आता राज्यातील सत्तेचे सूत्रे बदलल्यामुळे या मंडळीची विरोधाची धार आता गळून पडणार आहे. तसेच भाजप-शिवसेनेच्या (शिंदे गट) मंडळीचा वाटा घटणार असून, आगामी काळात या पक्षातील पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मैत्री करावी लागणार आहे. त्यामुळे सत्तेत असूनही सत्तेचे बाहुले होण्याची चिंता भाजप व शिवसेनेच्या (शिंदे गट) मंडळींना लागली आहे.

# तावखेडा फाट्याजवळ बर्निंग कारचा थरार

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

निमगूळ ता. शिंदखेडा रस्त्यावरील तावखेडा फाट्यालगत दि. १ रोज जुलै रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास हुंडाई कंपनीची आयटेन चारचाकी कारचा बर्निंग थरार पाहायला मिळाला. यात संपूर्ण कारचा कोळसा झाला. दोंडाईचा अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. मात्र कारला आग लागल्याचे समजताच चालक कार सोडून घटनास्थळावरून पळून गेला होता. दोंडाईचा पोलीस व अग्निशमन दलाच्या जवानांनी सतर्कता दाखवत ही आग पूर्णपणे विझवली. मात्र कार पूर्ण जळून खाक झाली होती.

दोंडाईचा निमगूळ रस्ताच्या दरम्यान तावखेडा फाट्याजवळ निमगूळकडून दोंडाईचाकडे येणार्या होंडाई कंपनी आयटेन चारचाकी वाहन क्रमांक एमएच १५ डीसी ४६९४ ला आग लागल्याचे समजताच चालक कार रस्त्यावर सोडून पळून गेला. कारने पेट घेतल्याचे लक्षात आल्यावर रस्त्यावरील जाणार्या नागरिकांनी दोंडाईचा पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर दोंडाईचा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचे जवान बंब घेऊन घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. संपूर्ण कार आगीच्या ज्वालानी वेढलेली होती.

## मृत्यूचा महामार्ग

विकासासाठी वेग आवश्यक असला तरी तो जीवघेणा ठरु नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महामार्ग हवेत, मात्र ते निर्दोष असावेत. त्यांच्या उभारणीत आर्थिक, राजकीय हितसंबंध जपणार्यांना नव्हे, तर तज्ज्ञांना स्थान मिळावे.

समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्ह्याच्या हद्दीत झालेला अपघात थरकाप उडविणारा होता. खासगी बसने पेट घेतल्याने त्यातील २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. समृद्धी मार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन सहा महिने उलटले आहेत. तेव्हापासून सुरु असलेले अपघाताचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. इतर महामार्गही तेवढेच असुरक्षित आहेत. धुळ्यातील शिरपूर तालुक्यात आग्रा महामार्गावर कंटेनरमुळे दहा बळी गेले. खासगी बस व्यावसायिकांची मनमानी, बस चालकांची बेदरकार वृत्ती, याबरोबरच सुरक्षित प्रवास आणि मदतीसाठी महामार्गावर व्यवस्था नाही, हे वास्तव समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातातून समोर आले. सुन्न करणार्या अपघाताच्या घटनेनंतर उपचार म्हणून यंत्रणांनी हालचाल केली. मरण पावलेल्या प्रवाशांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत जाहीर झाली; पण पुढे काय? वेगाशी स्पर्धा करीत समृद्धी महामार्गावरून धावणार्या वाहनांमधील व्यक्तींच्या सुरक्षिततेचे काय? वाहने चालविताना वेगाचे भान ठेवावे, असा सार्वत्रिक सल्ला दिला जातो; पण मुळात जास्तीत जास्त वेग आणि कमीतकमी वेळात इच्छित स्थळी पोहोचणे, हाच तर समृद्धी महामार्गाचा उद्देश आहे! ते गणित मांडून महामार्गाची उभारणी करताना असुरक्षिततेची टांगती तलवार ठेवली गेली, हे विसरुन चालणार नाही. ती दूर करण्यासाठी कोणती पावले उचलली जाणार, हा खरा प्रश्न आहे. उद्घाटनानंतर आतापर्यंत शंभरच्या आसपास बळी घेणारा दुसरा रस्ता राज्यात नसावा! समृद्धी महामार्गावरील अपघातांची संख्या ४४९ च्या घरात आहे. खासगी बसची रचना अपघातानंतर सुटका करून घेण्यात अडथळा ठरत आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची वेळ आली आहे.

मानवी चुका हेच कारण

अपघात झाला तर बसमधून बाहेर पडण्यासाठी आपत्कालीन दरवाजा असतो. मात्र, स्लीपर कोच असेल आणि विशेषतः आगीसारखी दुर्घटना घडली असेल तर प्रवाशांना बाहेर पडणे कठीण ठरते, हे दिसून आले आहे. बसमधून बाहेर पडण्याच्या दरवाजाच्याच बाजूने बस उलटली तर सुटकेचा पर्याय काय? मानवी चुका हा वाहनांच्या अपघातांचे मुख्य कारण. अमर्याद वेग, वाहन चालविण्याच्या ताणातून चालकाची संभ्रमित अवस्था होणे, चालकाला डुलकी लागणे अशा कारणांतून अपघात घडतात. दूरच्या टप्प्यात प्रवासी वाहतूक करणार्या बसमध्ये दोन चालकांची व्यवस्था झाल्यास आळीपाळीने त्यांना वाहन चालविता येईल आणि अपघातांचा धोका कमी होऊ शकेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला असलेल्या मर्यादेमुळेदेखील बहुसंख्य ठिकाणी प्रवाशांना खासगी बस सेवेचा आधार घेण्याशिवाय पर्याय रहात नाही. ही 'सेवा' प्रत्यक्षात व्यावसायिकांच्या नफेखोरीमुळे अव्यवस्थेचे ओंगळ रुप बनली आहे. प्रवाशांची लूटमार, हे खासगी बस सेवेचे अलीकडच्या काळात बनलेले वैशिष्ट्य. बस सुस्थितीत आहे का, टायर कार्यक्षम आहेत का? याची तपासणी, अन्य नियम सारे काही आहे; पण संबंधित शासकीय यंत्रणांशी असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळे प्रवाशांची होरपळ कायम राहते. सिंदखेडराजाजवळ झालेल्या अपघातात असे प्रवासी केवळ होरपळत नाहीत, तर त्यांचा कोळसा होतो! महामार्गांवरील अपघात स्थळांबद्दल वाहनचालकांना सजग करणे आवश्यक आहे. समृद्धी महामार्गावर सर्वाधिक अपघात वाशिम, बुलढाणा या जिल्ह्यांच्या हद्दीत झाले आहेत. त्या ठिकाणी रस्ते बांधणीचे कंत्राट दिलेल्या कंपनीच्या कारभारावरून आरोप झाले. मार्ग सुरु होण्याआधी तेथील काही कमानी कोसळल्या. त्यात बळी गेले. विदर्भ ट्रॅव्हल्सच्या बसला झालेल्या अपघातानंतर जागी झालेली शासकीय यंत्रणा त्यावेळी काय करीत होती? रस्ते बांधणीचा अनुभव नसलेल्यांकडे समृद्धी महामार्गासंदर्भात दिलेले सर्वाधिकार, हा देखील कळीचा मुद्दा होता. रस्ता ओलांडणारे वन्यप्राणी हा घटक सुद्धा समृद्धी महामार्गावरील अपघातांना कारण ठरला आहे. नागपूर - मुंबई प्रवासाचे अंतर समृद्धी महामार्गामुळे आठ तास कमी झाले, असे ढोल पिटले गेले तरी सुरक्षा यंत्रणेच्या अभावामुळे हा मार्ग मृत्युचा सापळा बनला. राज्यातील पहिला कॉरिडॉर मुक्त महामार्ग, असेही समृद्धी महामार्गाचे वर्णन केले जाते. 'इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट' तेथे असेल, असेही जाहीर झाले. प्रत्यक्षात ती यंत्रणा अद्याप तेथे नाही. यामुळे अपघात झाला तरी तातडीने मदत मिळण्याची शक्यता नाही. सरळ रेषेतील रस्ते अपघातांना कारण ठरतात, असे अनेक तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. त्याचा गांभीर्याने विचार केला जाईल का?

# इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीचा उत्तम पर्याय

विद्यार्थ्यांसाठी बारावीचे वर्ष म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाचे वळण असे म्हटले जाते. त्याचे कारण म्हणजे विद्यार्थी बारावी नंतर प्रवेश करतात ते व्यवसायिक शिक्षण क्षेत्रात. नुकत्याच विद्यार्थ्यांनी बारावीची मुख्य परीक्षा व विविध अभ्यासकांच्या प्रवेश पात्रता परीक्षा दिल्या आणि आता त्यांच्या व पालकांच्या समोर हा यक्षप्रश्न येऊन ठेपाला आहे की आता बारावी नंतर पुढे काय ?.


आज व्यवसाय क्षेत्रातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहेत. त्यातील महत्वाच्या पर्यायांपैकी मेडिकल, प्यारा मेडिकल, इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट, कॉमर्स, सायन्स लॉ इत्यादी व काही इतर विद्यार्थ्यांना हमखास रोजगार उपलब्ध करून देणारे पर्याय आहेत. उपलब्ध पर्यायांपैकी योग्य आणि सर्वोत्कृष्ट पर्याय निवडण्याचे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. अभियांत्रिकी क्षेत्राबद्दल बोलायचे झालेच तर परंपरेनुसार हा सर्वोत्तम पर्याय म्हणून ओळखला जातो. कारण परंपरेनुसार इंजिनिअरिंग सर्वाधिक रोजगार देणारी विद्याशाखा आहे, आणि भारतासारख्या डेव्हलपिंग देशात आजही स्किल इंजिनीरिंची खूप मागणी आहे. त्यातच वेगाने होणारे टेक्निकल बदल हाताळण्याकरता लागणारे मनुष्यबळ हे मोठं आव्हान सर्व उद्योगासमोर आहे. म्हणून ॲडमिशन घेताना काय काळजी घेतली पाहिजे?, हे या लेखाच्या माध्यमातुन, सांगण्याचा एक प्रयत्न आहे.

प्रामुख्याने कुठलाही पर्याय निवडताना काही विशेष बाबींकडे कडे बघितले जाते व ते म्हणजे त्या अभ्यासक्रमासाठी लागणारा कार्यकाळ, शैक्षणिक खर्च व नंतर येणारा परतावा परंतु त्याचबरोबर महत्त्वाचं म्हणजे job satisfaction. अभियांत्रिकी हा एकमेव पर्याय असा आहे की ज्यामध्ये सर्व या सर्व गोष्टी पूर्ण होऊ शकतात.

विद्यार्थी बारावी विज्ञान करून अभियांत्रिकी क्षेत्रात प्रवेश मिळवु शकतो. या क्षेत्रात अनेक शाखा आणि उपशाखा आहेत, सामान्यतः अभियांत्रिकी शाखांना हार्ड ब्रांच अँड सॉफ्ट ब्रांच अशा पद्धतीने विभागले जाते. सोबतच प्रत्येक शाखांमध्ये वेगळ्या प्रकारच्या जॉब प्रोफाइल उपलब्ध आहेत. अभियांत्रिकी क्षेत्रातील शाखानिवड करताना वरील सर्व बाबींचा सखोल विचार आणि अभ्यास करणे आवश्यक आहे. जॉब प्रोफाइल सोबत येणाऱ्या वर्षात अभियांत्रिकी क्षेत्रातील लागणारे मनुष्यबळ यांचा देखील प्रामुख्याने विचार करणे गरजेचे असते.

२१ वे शतक हे इतिहासत ओळखले जाईल, ते या शतकात झालेल्या डिजिटल क्रांतीमुळे आणि त्यामुळेच आजच्या डिजिटल युगात विविध क्षेत्रातील आव्हाने पेलण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा वापर अनिवार्य झालेला आहे. कोरोना काळात ींळीींरिश्र कनेक्टिटीव्हिटीमुळे खूप काही आव्हाने अगदी अलगदपणे पैलेली गेली .

आज जागतिक पातळीवर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखेला प्रचंड मागणी आहे. या शाखेचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करु शकतात. आजच्या अभियांत्रिकी शिक्षणास ज्ञान, आकलन, कौशल्य, आजची आणि उद्याची



काळाची गरज यांची उत्तम सांगड घातली आहे. तसेच बहुतांश विद्यार्थ्यांना अकरावी व बारावी मध्ये इलेक्ट्रॉनिक्सची ओळख झालेली असतेच

मागील काही वर्षात सरकारने अनेक नव्या उपक्रमांना सुरुवात केली आहे, त्यातील महत्वाचे उपक्रम म्हणजे डिजिटल इंडिया व मेक इन इंडिया या उपक्रमाअंतर्गत अधिकाधिक रोजगार उपलब्धिची हमी दिली आहे. पण प्रत्यक्षात रोजगार संधी साठी योग्यतेचे मनुष्यबळ देशाकडे उपलब्ध असेल का ? हा मोठा प्रश्न आहे. कारण मागील काही वर्षापासून विद्यार्थ्यांचा कल इलेक्ट्रॉनिक्स, डिजिटल इलेक्ट्रॉनिक किंवा कम्युनिकेशन सारख्या क्षेत्रात कमी झालेला दिसतो. त्यामुळे कदाचीत येणाऱ्या वर्षामध्ये कुशल मनुष्यबळाचा या क्षेत्रात तुटवडा जाणवू शकतो, मेक इन इंडिया (मेक इन इंडिया डॉट कॉम) च्या अग्रलेखातून दिसून येते की इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम डेव्हलपमेंट या क्षेत्रात सरकारच्या नॅशनल नॉलेज नेटवर्क, नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क, टॅबलेट फॉर एज्युकेशन सेक्टर, डिजिटायलिझशन पॉलीसी, अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून देश-विदेशातील गुंतवणूकदार आपल्या देशात प्रोजेक्ट इम्प्लिमेंटीशन साठी तयार आहेत. जवळजवळ चार हजाराहून अधिक उद्योग भारतात डिजिटल इंडियाच्या माध्यमातून उभारायला सुरुवात करत असताना इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन क्षेत्रात कमी होणारा विद्यार्थ्यांचा कल ही एक गंभीर बाब आहे. देशात इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीज आणि इलेक्ट्रॉनिक्स किंवा टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग ची गरज विद्यार्थी तथा पालकांनी ओळखली पाहिजे. देशात इलेक्ट्रॉनिक्स प्रॉडक्टच्या मागणी मधील ६५% उत्पादनाने बाहेरून मागावे लागतात कारण खऱ्या अर्थाने आपण इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात उत्पादनासाठी सक्षम नाही.

विदेशी उत्पादनाचा वापर हा देशाच्या हिताचा नाही हे ओळखून माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी

यांनी देखील देशात मेक इन इंडिया च्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीज डेव्हलप करण्याचा पूर्ण निर्धार करून त्यावर अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. सध्या मेक इन इंडिया च्या माध्यमातून खालील महत्वाचे प्रकल्प राबवले जात आहेत.

१) Electronics System Design Manufacturing (ESDM)
२) Electronics manufacturing services (EMS)
३) Electronic Manufacturing Clusters (EMC)
४) Electronics Component Industries

अनेक विदेशी उत्पादकांनी भारतात प्रकल्पाची उभारणी सुरुवात असून यात USD 10.05 Billion ची गुंतवणूक आहे. या कंपन्या सोबतच अनेक शासकीय प्रकल्प राबवण्यात येणार असून आगामी काळात देशात इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीज भरपूर प्रगती करेल व तरुणांना इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. अशा परिस्थितीत दूरदृष्टी ठेवून पालकांनी व विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधी ओळखत पर्याय निवडणे अपेक्षित आहे. जेव्हा विद्यार्थी या शाखेचा अभ्यास करतो तेव्हा तो वेगवेगळ्या क्षेत्राला लागणारे प्रॅक्टिकल कौशल्याचे शिक्षण घेतो उदारणार्थ.

१. मेडिकल क्षेत्रात लागणारी अत्यावश्यक उपकरणे इन्स्टॉलेशन आणि दुरुस्तीसाठी या शाखेचे विद्यार्थी लागतात

२. एलशवववशव ड्रींशा मुळे इंडस्ट्रियल ऑटोमेशन मध्ये मोठी क्रांती होतं आहे. उदा. ऑटोमोबाईल मध्ये vehicle speed dial, -irbag System, Music system, गॅस सिस्टिम अशी अनेक माहिती व्हेईकल डॅशबोर्डवर मिळते

३. कम्युनिकेशन म्हणजे घरातील लँडलाइन टेलिफोन पासून सॅटेलाईट पर्यंत, मोबाईल वायरलेस सेन्सर नेटवर्क, डिफेन्स कॉम्प्लेक्स सिस्टीम डिझाईन मध्ये तसेच स्पेस रिसर्च मध्ये या विषयामुळे विद्यार्थ्यांना मागणी आहे.

४. आद्यवत पावर प्लांट डिझाईन मध्ये सोलर सिस्टिम वापर करून कंट्रोल सिस्टीम व पॉवर



प्रा. (डॉ) दीपक पाटील
प्राचार्य, संदीप फाऊंडेशन (SIEM), नाशिक.
मो.९५४५४५३२६५

इलेक्ट्रॉनिक्स या दोन विषयांत संशोधन आणि विकासाच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत.

५. कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल दैनंदिन जीवनासाठी लागणारे उपकरणे निर्मिती, इंस्टॉलेशन आणि दुरुस्ती मध्ये रोजगाराच्या व उद्योजकतेच्या संधी या विदयाशाखेत उपलब्ध आहेत


६. चीप डिझाईन यासाठी visi Design व Electronics system design सारखे विषय या शाखेत शिकवले जातात, त्यासोबतच डिजिटल इमेज प्रोसेसिंग, डिजिटल सिग्नल प्रोसेसिंग नॅनोटेकनॉलॉजि आणि मेकॅट्रॉनिकस या विषयामध्ये अँप्लिकेशन बेस्ड प्रोजेक्ट्स तयार करुन स्वयंरोजगार निर्मिती देखील केली जाऊ शकते.

नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार येत्या पाच वर्षात टेलिकॉम क्षेत्राचा प्रभाव वाढत राहणार आहे आणि या क्षेत्रात दहा लाखाहून अधिक नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. टेलिकॉम हे विस्तृत क्षेत्र आहे, ज्यात हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर दोन विभाग सहभागी असल्यामुळे या क्षेत्रात नोकऱ्यांचे प्रमाण इतर शाखांपेक्षा जास्त असणार आहे. टेलिकम्युनिकेशनमुळे रेल्वेचे तिकीट बुक करणे, जन्म व मृत्यु प्रमाणपत्र बनवणे, ऑनलाईन बँकिंग सेवा, ऑनलाइन तक्रार निवारण कक्ष, ऑनलाइन मार्केटिंग सारख्या पर्यायांचा वापर अनिवार्य होणार आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा प्रभाव बिग डेटा, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्स, कंपुटींग पॉवर, क्लाऊड कम्प्युटिंग, यामुळे लक्षणीय वाढला आहे. सध्या देशात 5G तंत्रज्ञानाचा वापर हा फक्त कम्युनिकेशन आणि एंटरटेनमेंट पुरता नसुन आरोग्य सेवा, शिक्षण, अर्थ, उद्योग, दळणवळण आणि शेती क्षेत्रात देखील मैलाचा दगड ठरनार आहे. येत्या आर्थिक वर्षात रिटेल आणि हँडसेट विभागात ३५% सेवा पुरविणाऱ्या कंपन्या, २९ % नेटवर्क आणि आयटी विक्रेते, १८%, टेलिकॉम उपकरण निर्मिती, १५%, पायाभूत सुविधा पुरवणाऱ्या कंपन्या ३%, अश्या १० लाख नोकऱ्या उपलब्ध असतील. भारतातच नव्हे तर जगात प्रगतीपथावर झालेल्या क्रांती मागे सिंहाचा वाटा आहे तो इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनचा भारत सरकारने आखलेली धोरणे ही देश-विदेशात इंजिनिअरिंग क्षेत्राला पुढे नेणारी आहेत. डिजिटल इंडिया स्मार्ट सिटी, मेक इन इंडिया ई-क्रांती, ई-गव्हर्नन्स, डिजिटल स्टार्टअप अशा अनेक योजना ए ढउ इंजिनीअरला रोजगार उपलब्ध करून देण्यास सक्षम असणार

आहेत. परंतु एकंदरीत लागणारे सक्षम मनुष्यबळ उपलब्ध करण्याचे मोठे संकट आता भारतासमोर उभे आहे. येणाऱ्या वर्षात अभियांत्रिकी क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन चे महत्व आणि गरज याविषयी जागरूकता असणे अत्यंत गरजेचे, आहे.

या शाखेचा अभ्यासक्रम शिकल्याने विद्यार्थ्यांना मोठमोठ्या कंपन्यांमध्ये आंतराष्ट्रीय स्तरावर मागणी आहे तसेच एमपीएससी युपीएससी मध्ये देखील या शाखेच्या जागा असतात. हार्डवेअर व सॉफ्टवेअर कंपन्या मध्ये नोकरीबरोबर सार्वजनिक उद्योग, सरकारी व निमसरकारी कार्यालये, राष्ट्रीयीकृत बँका, हॉस्पिटल, अंतराळ संशोधन संस्था, मिलिट्री ऑटोमॅटिक रिसर्च सेंटर, डी आर डी ओ, वीज कंपन्या, तसेच टेलिफोन इंडस्ट्री, सिविल एव्हीएशन, वेगवेगळ्या राज्यातील डेव्हलपमेंट सेंटर, डिफेन्स एयर इन पी एल, एअर टेलीग्राफ डिपार्टमेंट, अशा अनेक ठिकाणी या शाखेतील विद्यार्थ्यांची गरज आहे. त्यामुळे भविष्याची गरज ओळखून आपण योग्य शाखेची निवड आत्ताच करावी व आपले भविष्य उज्वल होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करावे.

## शब्दकोडे-११३



आडवे शब्द

१. धंदा, उद्योग ५. खिशाला खार ९. दिवाळीतील बळीराजाचा दिवस ११. श्रीकृष्णाचे एक नाव १४. प्रत्येक वर्षी १६. हिंमत १८. निमित्त १९. लहान बाळ २०. शुभ्र, पांढरा २२. मातीच्या वासाचे २४. वरपांगी २५. अंत:करण २६. अरण्य २८. न दबणारे, कडक २९. दुर्दशा ३०. कंबर ३१. अमृत ३४. समोरासमोरची चकमक ३५. वंदन ३६. नारळाचे झाड ३७. कल्पना मूर्त रूपात आणणारा ३८. उमर ४०. अनावश्यक, नको असता ४२. मयूर ४४. मोठा नगारा ४६. टोळीचा प्रमुख ४८. दुष्ट ४९. पालक पित्यावरून श्रीकृष्णाचे एक नाव ५०. सत्व ५२. तोफगाडी ५४. गणपतीची आई ५५. अर्धांगवायू ५७. लोकोत्तर पुरुष ५९. वाईट सवय ६०. च्या शिवाय ६२. धान्यघर ६५. शेराला कधीतरी भेटणारा ६६. तमाशातील सोंगाड्या ६७. तेज, कांती ६९. भुंगा, भ्रमर ७०. भारवाहक ७१. घाई, त्वरा ७३. जानकी ७४. देहाची खोळ ७६. कळलाव्या मुनी ७८. सत्तेचा खेळ ८०. शिवरायांच्या नंतर ही उपाधी द्यावी असा नेता अद्याप दुर्मिळच! ८१. जमीन ८२.जखमेवरील औषध ८३. केळ्याची गोड जात

उभे शब्द

२. वस्ती ३. जेव्हा ४. चाहूल, पावलांचा आवाज ६. राजाची कचेरी, राजसभा ७. अनेकांना उकडीचे प्रिय! ८. भीती ९. पदर १०. बोलणे, वाणी १२. संधी १३. उन्हाची तीव्रता १५. निर्मितीसाठी आवश्यक घटक १६. प्रवासात सांभाळा! १७. च्या सह २१. चटकन २३. धनुष्याच्या दोरीचा आवाज २५. कामदेव २७. अभिनेत्री २९. बेफाम ३२. धैर्य, साहस ३३. उगीच, अकारण ३४. तात्पर्य ३९. हद्द ४१. साठ मिनिटे ४२. किंमत ४३. पत्रातील वि.वि. ४४. अडत्या ४५. धनी ४७. उंबरठा ४८. छोटा दगड ५०. न्यूनता ५१. षट, अर्धा डझन ५३. समुद्राच्या लाटांचा आवाज ५४. हरिणाचे पिल्लू ५६. मार्गक्रमण ५८. नको असलेला ६१. बाई ६३. भटक्या, गोसावी ६४. बहुरूपी ६६. करून सवरून वेगळा राहणारा ६८. वेदना ७२. अंकुर ७४. भावकी ७५. हुक्की, लहर ७७. दीर्घ श्वास ७९. गोडी

## शब्दकोडे ११२ चे उत्तर

आडवे उत्तर

१.जुगार ४.खजिना ६.दैत्य ७.मंगळागौर १०.लवकर १२.बाजू १३.माया १४.जय १६.वान १७.रखुमाई १८.बोटभर २०.नकलनवीस २२.टकनक २४.बातमीदार २६.डबा २८.रजक ३०.कंद ३१.सण ३२.सरणे ३४.न्यायालय ३६.सराईत ३८.भरीत ४०.जग ४२.तत्पर ४३.नटराज ४६.धमाल ४७.तया ४९.रबर ५१.बक ५३.कंपन ५५.चमत्कार ५७.खतरनाक ५९.यदा ६१.पाना ६२.रणतुंबळ ६३.वरण ६४.नख ६६.जंगली ६९.खापरपणजी ७३.वातड ७४.मालक ७६.वर्तन ७७.कथानक ७८.गाणे ७९.वितरण ८०.वानरी ८१.वडापाव

उभे उत्तर

१.गालबोट ३.रव ४.खर ५.नालायक ६.दैववान ७.मंजूर ८.गौराई ९.रया ११.कदर करणे १२.राजस १४.जनककन्या १५.जलद १६.नवीन १७अ. खुषीत १८.बोकड १९.भट २०अ.लठ्ठ २१.तोरणमरण २३.मज २४.बादरायण २५.दास २७.बासरी २९.पायजमा ३०.कंस ३३.रतन ३५.यान ३७.ततपप ३८.भटका ३९.तारा ४१.गलबत ४४.टणत्कार ४५.जर ४६.धर ४८.याचना ५०.बलाबल ५२.करवली ५३.कंकण ५४.नयन ५६.रणरण ५८.नार ६०.दाखल होणे ६१.पारखा ६५.घोर ६६.जंत ६७.गडकरी ६८.काक ७०.पर्वत ७१.पठण ७२.जीवन ७३.वानवा ७४.मानव ७५.लकडा ७८.गाव

## वाढदिवसाचे अध्यात्मिक प्रयोजन

- संत राजिन्दर सिंह जी महाराज

आपण सर्वजण आपल्या आयुष्यात वाढदिवस खूप आनंदाने साजरा करतो, वाढदिवसाच्या खास दिवशी आपल्या चेहऱ्यावर आनंद ओथंबून वाहत असतो. म्हणूनच आपण आपला प्रत्येक दिवस वाढदिवस मानला पाहिजे. जेव्हा आपण रात्री झोपायला



जातो तेव्हा आपण दुसऱ्या दिवशी सकाळी उठू की नाही, हे कोणालाच माहीत नसते. जेव्हा आपण दुसऱ्या दिवशी सकाळी उठतो तेव्हा तो नवीन दिवस आपला वाढदिवस म्हणून साजरा केला पाहिजे. याचा अर्थ जगण्याच्या दृष्टीने प्रत्येक दिवस हा आपल्या आयुष्यातील सर्वात खास दिवस असतो.

तो दिवस खास बनविण्यासाठी आपण काय करू शकतो? आपण प्रत्येक दिवस आपला खरा वाढदिवस म्हणून साजरा करू शकतो. बरेचसे लोक त्यांचा दिवस कसा घालवतात? ते उठतात, आंघोळ करतात, कपडे घालतात, नाश्ता करतात, एकतर त्यांच्या कुटुंबाची काळजी घेतात किंवा कामावर जातात. ते आपला बराचसा वेळ आपला उदरनिर्वाह करण्यात घालवतात, त्या नंतर रहदारीशी लढत घरी परततात, रात्रीचे जेवण करतात, आपले मनोरंजन करतात आणि आपल्या अंथरुणावर झोपण्यास घून जातात.

आपण वेळेचा अधिक अंश भाग शरीराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी घालवतो. वास्तवतः भौतिक शरीराच्या काळजीपेक्षाही आपल्या जीवनात बरेच काही आहे. तसेच या व्यतिरिक्त आपली एक आध्यात्मिक बाजू/ दृष्टिकोन आहे. जीवनातील प्रत्येक दिवस आपल्या जन्मदिवसाच्या रूपात साजरा करण्यासाठी जर आपण आपल्या अंतरातील विद्यमान दिव्यतेशी जोडले जाण्याचा प्रयत्न केला तर आपण प्रत्येक दिवस हा खरा जन्मदिन म्हणून साजरा करू शकू. आपला आत्मा प्रभु-परमेश्वरापासून विभक्त होऊन अनेक युगे उलटून गेली आहेत. आपला खरा जन्मदिवस तो असेल जेव्हा आपला आत्मा प्रभु-परमेश्वराशी पुन्हा जोडला जाईल. जे ध्यान-अभ्यास करतात आणि स्वतः अध्यात्मिक मंडळात चढाई करतात त्यांना हे समजते की हे भौतिक शरीर तात्पुरते आहे आणि हे जग आपले खरे घर नाही. आपल्या जीवनाचा मुख्य उद्देश हा आहे की या भौतिक अस्तित्वाच्या वरती जाण्यासाठी सक्षम होणे आणि आपण स्वतःला प्रभु-परमेश्वराचा एक अंश म्हणून आत्म्याला अनुभवणे.

**क्रमशः**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# प्रत्येक क्षेत्रात गुरूची आवश्यकता

## डॉ तुळशीराम महाराज गुट्टे; श्री सिध्दीविनायक मिशनतर्फे गुरूपौर्णिमा उत्सव

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रत्येक क्षेत्रात गुरूची आवश्यकता आहे. अध्यात्मात देवापर्यंत पोहोचण्यासाठी गुरू पाहिजे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी १३ व्या अध्यत्मात गुरुमहिमा सांगितला आहे. गुरू तेथे ज्ञान असून, जगात सर्वात पवित्र अन् श्रेष्ठ हे ज्ञान आहे. प्रत्येकाने ज्ञानी होण्याचा प्रयत्न करावा असे विचार संत साहित्याचे अभ्यासक डॉ तुळशीराम महाराज गुट्टे यांनी केले.

श्री सिध्दीविनायक मानव कल्याण मिशनतर्फे गुरू पौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबिर, विद्यार्थी गुणगौरव व डॉ.गुट्टे महाराज यांचे प्रवचन झाले.

छत्रपती संभाजीनगर मार्गावरील साई लिला लॉन्स येथे झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर पद्मश्री दादा इदाते, डॉ दे. घ.मुंडे, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाणऱ्याचे संचालक संजय आधाव, अनिल फड, भाजपचे शहराध्यक्ष गिरिश पालवे, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, हेमंत धात्रक, गुरुदेव कांदे,बबन खाडे,दामोदर मानकर , रमेशचंद्र घुगे, ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, सुनिल केदार, बंडू नाना भाबड, नगरसेविका पुनम सोनवणे, उपस्थित होते. अध्यक्षस्थानी परळी वैद्यनाथ येथील ज्येष्ठ डॉक्टर हरिश्चंद्र वंगे होते. गुट्टे महाराज म्हणाले की , गुरूच्या खडावा मी बनेल अशी शिष्याची भावना झाली पाहिजे. गुरुवर नितांत श्रद्धा असावी. प्रत्येक आश्रम , आखाड्यात गुरूंचे ऋण व्यक्त केले जात आहे. गुरू - शिष्यामध्ये वयाचा संबंध नाही. प्रत्येकाने आपल्या गुरूनी दाखविलेल्या मार्गाने मार्गस्थ व्हावे असे आवाहन डॉ गुट्टे महाराज यांनी केले. कार्यक्रमस्थळी अनेक भाविकांनी रक्तदान केले.समता रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले.

यावेळी पद्मश्री दादा इदाते यांनीही श्रीमद्भगवत गीतेचा ७ वा अध्याय ज्ञान आणि विज्ञान यावर आहे. प्रत्येकाने गीता अन् ज्ञानेश्वरीचा अभ्यास करावा. डॉ गुट्टे महाराज यांचे अध्यात्मिक अन् सामाजिक कार्य अनेकांच्या जीवनात प्रेरणादायी ठरले आहे. यापुढील काळात देखील डॉ गुट्टे महाराजांकडून दिव्य असे अध्यात्मिक अन् सामाजिक कार्य घडेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी डॉ दे. घ.मुंडे यांनी मनोगतात डॉ गुट्टे महाराज आणि त्यांचे गुरू विश्वनाथ शास्त्री यांची झालेली भेट अन् पुढील अध्यात्मिक प्रवास सांगितला. के के वाघ कॉलेजचे जनसंपर्क अधिकारी संजीव अहिरे यांनीही डॉ गुट्टे महाराज नाशिकमध्ये आल्यानंतरच अनुभव कथन केले. गुरुपौर्णिमा उत्सव यशस्वी होण्यासाठी सचिव सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे सचिव शाम पिंपरकर, गणपत हडपे, ठेकचंद पाटील, संजीव अहिरे, विजय सोनवणे, दिलीप अहिरे, सोमनाथ बोडके, अभिमान हाडपे, बाळकृष्ण नागरे,अनिल सांगळे, विनायक सांगळे, आदींसह सर्व पदाधिकारी , भक्त मंडळ प्रयत्नशील आहेत. यावेळी गुजरात येथील भक्त खाडे, उज्जैन (मध्य प्रदेश) येथील राजाराम जाट, गोवर्धन सिंग (चक्रावद,उज्जैन) यांच्यासह देशभरातील भाविक उपस्थित होते.



### या गुणवंत विद्यार्थ्यांचा झाला सत्कार....

यावेळी अभिषेक बोडके, सृष्टी खांडेकर, सार्थक बोडके, सृष्टी सांगळे, राधिका ठाकूर, वैष्णवी जाधव, स्पंदन जायभावे, सिध्दी पाटील, वैभवी फाल्गुने,पायल जाधव, गौरी गोतीसे,वैभवी गादीबसे या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी सर्वचजण मंत्रमुग्ध

### श्री स्वामीनारायण स्कूल येथे गुरुवंदना

**नाशिक । प्रतिनिधी**

पंचवटीतील श्री स्वामीनारायण इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमेच्या पावनप्रसंगी गुरुवंदना हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अनेक भजनांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

विद्यार्थ्यांनी प्रारंभी गणेश वंदना , त्यानंतर अच्युतम केशवम, केशवा माधवा, अवघे गरजे पंढरपुर, सत्यम शिवम सुंदरम, ऐसी लागी लगन, गोकुलमा एक वार ,बोलो राम राम या भजनांचा समावेश होता. महर्षी वशिष्ठ यांच्यावर आधारित नाटिकाही विद्यार्थ्यांनी सादर केली .यावेळी संस्थेचे प्रशासक माधवप्रकाश स्वामी यांनी गुरु ज्ञान पुराणी स्वामी यांचे पूजन केले.गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पालकांसाठी आरती थाळी सजावट स्पर्धा, रांगोळी व पुष्पहार बनवण्याची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरित करण्यात आले.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षात एसएससी परीक्षेत प्रथम आलेली शर्वरी कांगणे, द्वितीय आलेली कार्तिकी गायधनी व दुर्वेश गायधनी, तृतीय क्रमांक आलेल्या सार्थक बोडके व चौथी आलेली अक्षरा टांक यांचा सत्कार करण्यात आला. शाळेला मदत करणाऱ्या बिपिनभाई , जागर प्रतिष्ठान भारत तर्फे प्रसाद सानप उपस्थित झाले. त्यांनीही एसएससी परीक्षेत प्रावीण्य मीळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला. कार्यक्रमासाठी परमपूज्य ज्ञान पुराणी स्वामीजी ,प्रशासक माधवप्रकाश स्वामी, मुख्याध्यापिका अस्मिता पटेल यांचे मार्गदर्शन लाभले .कार्यक्रम यशस्वीतेसाठी संगीतशिक्षक राकेश बुवा, विवेक आहेर, अमित पगारे व नाट्यशिक्षिका मनीषा एकबोटे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन आरती आंबेकर, किशन रामचंदानी श्रावणी बोराडे व निष्ठा शिर्के यांनी केले. यावेळी मितल पटेल, अर्चना नाटकर व ज्योती पाटील, सोमनाथ बोडके आदीसह शिक्षक व पालक उपस्थित होते.



### स्पर्धेतील विजेते असे ...

**पालकांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आली. त्यात आरती थाळी सजावट स्पर्धा: चैताली मंडलिक, जयश्री जाधव तर रांगोळी स्पर्धेत सुवर्णा गायकवाड , जयश्री थोरात , प्राजक्ता अमृतकर तर उत्तेजनार्थ बक्षीस : स्वाती चव्हाण व पुनम सोनवणे यांना तर पुष्पहार स्पर्धेत चैताली मंडलिक ,सतीश मंडलिक व वैदेही बर्वे यांचा सन्मान करण्यात आला.**

# गुळवंचमधील संशयिताची आत्महत्या

**नाशिक ।** गावठी बंदुकीसह गावठी बॉम्बचा धाक दाखवून किराणा व्यापाऱ्याला धमकावणाऱ्या गुळवंच येथील संशयित विष्णू भाबड याने गुळवंच देवपूर रस्त्यावरील लक्ष्मण सानप यांच्या विहिरीत उडी घेत आत्महत्या केल्याची घटना आज (दि.५) सकाळी उघडकीस आली आहे. गुळवंच येथील आंबेकर नावाच्या किराणा व्यापाऱ्याला तेलाच्या रिकाम्या डब्यात बनवलेल्या गावठी बॉम्बने दुकान उडवण्याची धमकी त्याने दिली होती. त्यानंतर आंबेकरांच्या कुटुंबीयांनी पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर विष्णू आपल्या सहकाऱ्यांसह तेथून पळून गेला होता व त्याने घरी झोपेच्या गोळ्या मोठ्या प्रमाणावर घेतल्याची चर्चा होती. मालेगाव येथील बॉम्ब शोधक पथकाने बॉम्ब निकामी केल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षकांसह सर्वच पोलीस अधिकाऱ्यांनी गुळवंच येथे तळ ठोकला होता.

# सकस आहार पुरवणाऱ्या बचतगटांचे बिल लवकर द्यावे

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेच्यावतीने शहरातील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी बचत गटांमार्फत सकस आहार पुरवला जातो. सन २०२३ मधील जानेवारी महिन्यापासून मार्च महिन्यापर्यंतचे बचतगटांचे सकस आहाराचे बिल बचतगटांना अजूनपर्यंत अदा करण्यात आलेले नाही. तरी त्वरित बिल अदा करावे अशी मागणी शिवसेनेचे महानगर प्रमुख प्रवीण तिदमे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मनपा उपायुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मनपा उपायुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बचतगट हे अत्यंत अल्प दारात सकस आहार पुरवत असतात आणि जर तीन-तीन महिन्यांचे बिल अदा होत नसेल तर बचतगट सुरु ठेवणे महिलांना पडवणारे नाही. किराणा माल, वाहतूक, शेडचे भाडे दिल्यानंतर बचत गटांना मिळणारी रक्कम ही फारच कमी आहे. त्यामुळे बचतगटांचे गेल्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्चचे बिल लवकरात-लवकर अदा करण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे. निवेदन देताना शिवसेना महानगर प्रमुख प्रविण तिदमे, विधानसभा प्रमुख रोषण शिंदे , युवासेना महानगर प्रमुख दिगंबर नाडे, उप महानगर प्रमुख उमेश चव्हाण, उप महानगर प्रमुख आनंद फरताळे तसेच बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

---

**अॅड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**
**दि.कि.अर्ज नं. ७९१/२०२३**

१) नाना विनायक पाटील उ.वय.:- ६५वर्ष, कामधंदा-शेती
२) कैलास विनायक पाटील उ.वय.:- ५२वर्ष, कामधंदा-शेती
३) प्रल्हाद विनायक पाटील उ.वय.:- ४७वर्ष, कामधंदा-शेती
अर्जदार क्र १ ते ३ रा.नगाव ता.जि.धुळे
४) निलाबाई दिनकर पाटील उ.वय.:-६८, वर्ष,कामधंदा, घरकाम रा. दडेगाव ता.एरंडोल जि.जळगाव
५) सुंनदाबाई गंगाराम पाटील उ.वय.:-६८वर्ष, कामधंदा-घरकाम रा. लक्ष्मी नगर सुरत ता जि सुरत गुजरात राज्य
६) शोभबाई अरूण पाटील उ.वय.:-५६वर्ष, कामधंदा-घरकाम रा. मुडी बोदडे ता जि धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

कै.गिरजाबाई विनायक पाटील (मयत) मृत्यु दिनांक ६/५/२०२१ मुत्यु ठिकाण-नगाव ता.जि.धुळे ...**सामनेवाला**

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. ३०/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७९१/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै.गिरजाबाई विनायक पाटील (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ६ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १४/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, यांचे याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ६, न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणत दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १/७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कनिष्ठ लिपीक** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**सहायक अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

---

**अॅड.वासुदेव पगारे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो यांचे कोर्टात**
**फौ. कि. अर्ज नं. ७९३/२०२३**

१. कल्पना दिवाण बागल
२. सुमनबाई साहेबराव पगारे
३. सोनाली विजय पाटील .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

कै.साहेबराव बारकु पाटील ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोर्ट क्र.८ सो. यांचेकडे दि.३०/०६/२०२३ रोजी अर्जदार यांनी दि.कि.अर्ज.क्र. ७९३/२०२३ चा अर्ज कै.साहेबराव बारकु पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयताचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे.न्यायालयातुन अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणे कामी सदर अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.१०/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हीतचिंतक, वारस वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट क्र.८ सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीह हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०१/०७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** — **सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**
**सहायक अधिक्षक** — **सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**

---

**अॅड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग १ कोर्ट नं. ६ साहेब यांचे कोर्टात**
**फौ. कि. अर्ज नं. ४७४/२०२३**

रत्नाबाई भिला पाटील उ.व.:- ५०, कामधंदा :- शेती,
रा :- खोरदड ता. जि. धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय
खोरदड ता. जि. धुळे ...**सामनेवाला**

ज्याअर्थी कै. विठ्ठल दगा पाटील हे अर्जदाराचे सासरे होते. सदर कै. विठ्ठल दगा पाटील यांचा दि. १३/११/२००६ रोजी मौजे खोरदड ता. जि. धुळे येथे मयत झालेले आहे., त्याबाबतची मृत्यू नोंद होवुन मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायदंडाधिकारी सो. धुळे यांचे न्यायालयात दि. १७/०६/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं. ४७४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला

आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२१/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. सह न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०५/०७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** — **सह न्यायदंडाधिकारी सो. धुळे**
**सहायक अधिक्षक** — **सह न्यायदंडाधिकारी सो. धुळे**

---

**अॅड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ५वे सह दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**
**दि. कि. अर्ज नं. ७७२/२०२३**

१) धनराज शामराव पाटील उ.वय.: -४८वर्ष, कामधंदा-नौकरी
२) रविद्र शामराव पाटील उ.वय.:-४६वर्ष, कामधंदा-शेती
३) लताबाई संभाजी सुर्यवंशी उ.वय.:-४५वर्ष, कामधंदा-घरकाम
रा. पोष्ट वडजई ता जि धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

कै.शामराव मोतीराम पाटील(मयत) मृत्यु दिनांक १३/११/२०१९ मुत्यु ठिकाण नगाव ता.जि.धुळे ...**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि.२७/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७७२/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. शामराव मोतीराम पाटील (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०९/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ५, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :-धुळे
दिनांक :-३०/०६/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**सहायक अधिक्षक** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

---

**अॅड. प्रेम सी. भामरे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७४३/२०२३**

विजय नरेंद्रसिंग परदेशी .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

१) कै. ताराबाई मुंकुंदसिंग परदेशी
(मयत दि. २३/११/२०१३)
२) कै. नरेंद्रसिंग मुंकुंदसिंग परदेशी
मयत दि. २१/०७/२०२० ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. ताराबाई मुंकुंदसिंग परदेशी व कै. नरेंद्रसिंग मुंकुंदसिंग परदेशी यांचे वारस असल्याचे ठरवुन बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १९२७ चे कलम VIII प्रमाणे शासकीय व निमशासकीय कामाकरिता दाखला मिळणेसाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जावरून वारस दाखला देणेबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक तक्रार, हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मा. ४ थे सह दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर धुळे यांचे न्यायालयात दि. १०/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून अर्जदाराच्या लाभात वारस दाखला देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि. ३०/०६/२०२३

(शिक्का)
**कनिष्ठ लिपीक** — **दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, धुळे**
**सहायक अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, धुळे**

---

**प्रोसेस जमा** **अॅड. सी. जे. सुर्यवंशी, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात**
**दि.कि. अर्ज नं. ७७५/२०२३**

गौतम राजेश खिलोसिया .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

कै. राजेश चमनलाल खिलोसिया ...**मयत**

ज्याअर्थी दि.२७/०६/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. राजेश चमनलाल खिलोसिया यांचे कायदेशीर वारस आहेत. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख १६/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. क्रमांक ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तकार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर कामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवुन सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तकारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ०३/०७/२०२३

(शिक्का)
**कनिष्ठ लिपीक** — **दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे**
**सहायक अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे**

---

**अॅड.रोहिदास एच. पाटील**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग १ सो. धुळे यांचे कोर्टात**
**फौ. कि. अर्ज नं-४६४/२०२३**

भाईदास भगवान पाटील उ.व.:- ४४, कामधंदा :- शेती
रा.:- मु.मेहु पो. टेहू ता. पारोळा जि. जळगांव .....**अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी सो..
ग्रामपंचायत कार्यालय,
विंचुर, ता. जि. धुळे ...**सामनेवाला**

(भाईदास भगवान पाटील याचा जन्म दि.०१/०६/१९७९)

ज्याअर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि. १४/०६/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं.४६४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.०३/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, श्री भाईदास भगवान पाटील याचा जन्म दि.०१/०६/१९७९ याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग-जॉईंट कोर्ट सो यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक : ०५/७/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** — **मे.८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १, धुळे**
**सहायक अधिक्षक** — **मे.८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १, धुळे**

## न्यूज कॉलम

### मुकेश पटेल सैनिकी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

**शिरपूर ।** वश्री विलेपार्ले केळवाणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेशभाई आर. पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिक्षिका श्रीमती सुवर्णा माळी यांनी या दिवसाचे महत्त्व सांगितले.

### तिघां मुलींना घेवून विवाहिता बेपत्ता

**धुळे ।** शिरडाणे ता.धुळे गावात राहणारी एक महिला तिच्या तिघां मुलींना सोबत घेवून कोठेतरी निघून गेली आहे. दत्तू भिवसन हिगमिरे (वय ३३)यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.२६ जून रोजी दुपारी १२ वाजता दत्तू यांच्या मुली आरती,दिव्या आणि मयुरी यांना सोबत घेवून पत्नी ज्योती दत्तू हिगमिरे (वय २९) ही राहत्या घरुन कोठेतरी निघून गेली.तालुका पोलिसात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.तपास पोना वाय.बी. पाटील करीत आहेत.

# टोमॅटोच्या दरात वाढ, १०० ते १२० किलोला

**धुळे । प्रतिनिधी**

सध्या देशभरात टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. दिल्लीत टोमॅटोचे दर हे १०० ते १२० रुपये प्रतिकिलोवर गेले आहेत. आशियातील सर्वात मोठी फळे आणि भाजीपाला बाजारपेठ असलेल्या आझादपूर मंडईत टोमॅटोचे घाऊक दर हे ६० ते १२० रुपये प्रतिकिलो असून गुणवत्तेनुसार सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. तर दुसरीकडे वाढत्या टोमॅटोच्या किंमतीमुळं सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागत आहे.

देशातील बहुंताश राज्यात जोरदार पाऊस सुरु आहे. या पावसाचा टोमॅटोच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. तसेच या पावसामुळं टोमॅटो पिकांचं नुकसान देखील झालं आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळं बाजारात टोमॅटोचा तुटवडा देखील भासत आहे. परिणामी टोमॅटोच्या दरात वाढ झाली आहे. मदर डेअरीच्या सफाल विक्री केंद्रात १०० रुपये किलोने टोमॅटोची विक्री होत होती. तर बिगबास्केटवर टोमॅटोचे दर हे १०५ ते ११० रुपये किलोवर आहेत. टोमॅटोचे दर केवळ दिल्ली-एनसीआरमध्येच नाही तर देशाच्या इतर भागातही गगनाला भिडले आहेत. टोमॅटोच्या दरात वाढ ही हवामानातील झालेल्या बदलामुळं झाल्याचे सरकारनं म्हटलं आहे.

पावसामुळे प्रमुख टोमॅटो उत्पादक राज्यातून पुरवठा खंडित झाल्याने टोमॅटोचे भाव वाढले असल्याची माहिती आझादपूर टोमॅटो असोसिएशनचे अध्यक्ष अशोक कौशिक यांनी दिली. कौशिक हे कृषी उत्पन्न विपणन समिती आझादपूरचे सदस्य देखील आहेत. पावसामुळे हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमधून टोमॅटोचा पुरवठा झपाट्याने कमी झाला आहे. आता दिल्ली-एनसीआर क्षेत्रासाठी हिमाचल प्रदेश हा एकमेव पुरवठादार असल्याची माहिती अशोक कौशिक यांनी दिली. सध्या उत्तर भारतात मुसळधार पाऊस पडत असल्याने काढणी आणि वाहतुकीवरही परिणाम होत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील टोमॅटो उत्पादक केंद्रांतून व्यापाऱ्यांना टोमॅटोचा पुरेसा पुरवठा होत नाही. त्यामुळं पावसाने दडी मारल्याने भाव चढे आहेत.



### टोमॅटोच्या दरात घट होण्याची शक्यता

**सध्या २५ किलोच्या क्रेटची किंमत २४०० ते ३००० रुपये आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये पावसाची स्थिती सुधारल्यानंतर पुढील १५ दिवसांत दिल्ली-एनसीआर भागात टोमॅटोचा पुरवठा वाढण्याची शक्यता आहे. तोपर्यंत टोमॅटोचे भाव चढेच राहतील. पुरवठा वाढल्यावर टोमॅटोच्या दरात घट होण्याची शक्यता असल्याचे मत आझादपूर टोमॅटो असोसिएशनचे अध्यक्ष अशोक कौशिक यांनी व्यक्त केले.**

### महाराष्ट्रातही टोमॅटो दरात वाढ

**मागील महिन्यात टोमॅटोचे दर हे १० रुपये किलोवर पोहोचले होते. त्यानंतर आता देशातील टोमॅटोच्या दरात मोठी वाढ होताना दिसत आहे. महाराष्ट्रातही टोमॅटोचे दर वाढले आहेत. काही भागात हे दर १४० रुपये प्रति किलोवर गेले आहेत. टोमॅटोनं पेट्रोलचे दर मागे टाकल्याची प्रतिक्रिया ग्राहक देत आहेत. यामुळं सर्वसामान्यांचं बजेट कोलमडल्याचं चित्र बघायला मिळत आहे. विदर्भातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे टोमॅटो मे महिन्यापासून बाजार येणं बंद झाले आहेत. परिणामी ग्राहकांची मागणी बघता विदर्भात दक्षिणेतून टोमॅटो आयात केली जात आहेत. मात्र, मागणीनुसार टोमॅटोचा अगदी कमी पुरवठा होत असल्यानं टोमॅटोचे दर वाढल्याचं सांगितलं जातं आहे.**

# धुळ्यातील अंगणवाडी सेविकांची भरती नियमानुसार करा : शुभांगी पाटील

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागातर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या अंगणवाडी कर्मचारी भरतीत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याच्या तक्रारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या महिला आघाडीकडे आल्या होत्या. त्याची दखल घेत धुळ्यातील महिला बाल विकास कार्यालयात शिवसेना महिला आघाडीच्या उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख शुभांगी पाटील व जिल्हाप्रमुख महिला आघाडी हेमा हेमाडे तसेच महिला पदाधिकारी यांनी नाशिक विभागाचे उपायुक्त पगारे धुळे येथे आले असता त्यांना घेराव घालत या भरती घोटा ळ्याचा जाब विचारला.

याप्रसंगी भरती प्रक्रिया बाबत सर्व कागद पत्रांची तपासणी व माहिती घेता या भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा करण्यात आल्याचे उघडकीस आले असून ज्या ज्या उमेदवारांना परीक्षेमध्ये कमी गुण होते त्या उमेदवारांचे गुण बेकायदेशीरपणे वाढवून त्यांना नियुक्ती देण्यात आल्या असून लायक उमेदवारांना डावलण्यात आलेले आहे. यामध्ये विविध कॅटेगिरी मध्ये गुणदान देण्यात येणार होते व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात घोळ करण्यात येऊन पसंतीच्या उमेदवारांना अर्थपूर्ण देवाण-घेवाण करून वाढीव गुण देऊन नियुक्त करण्यात आल्या व लायक उमेदवारांना डावलण्यात आले. याबाबत डावलण्यात आलेले अनेक महिला उमेदवार देखील उपस्थित होत्या. त्यांच्या समक्ष महिला आघाडीच्या शुभांगीताई पाटील व जिल्हाध्यक्ष हेमाताई हेमाडे यांनी कागदपत्र दाखवत उपायुक्त यांच्या समोर या भरती घोटाळ्याचा पर्दाफाश केला असून सदरची भरती तात्काळ रद्द करण्यात येऊन सर्व गुणदान तपासण्यात येऊन योग्य व लायक उमेदवारांना नियुक्ती देण्यात याव्या अन्यथा शिवसेना उबाठा तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने शुभांगी ताई पाटील यांनी दिला आहे.

### वरूळ येथे आर. सी. पटेल इंग्लिश स्कूल मध्ये गुरू पौर्णिमा साजरी

**शिरपूर ।** तालुक्यातील वरूळ येथे आर. सी. पटेल इंग्लिश स्कूल मध्ये गुरू पौर्णिमा साजरी करण्यात आली. गुरू पौर्णिमेचे औचित्य साधून शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी गुरू व शिष्य संवाद नाटिका सादर केली. ज्यातून गुरुचे महत्व आपल्या आयुष्यात काय असते आणि गुरू आपल्याला कसे योग्य मार्गावर घेऊन जातात हे सांगण्यात आले. मुख्याध्यापिका सपना मराठे यांनी विद्यार्थ्यांना गुरू चे महत्व विशद करून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# अजित पवारांच्या पुतळ्याला फरफटत नेले



**दोंडाईचा । प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे नेते आमदार अजित दादा पवार यांनी विरोधी पक्ष नेत्याचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली शिवाय राष्ट्रवादीच्या आठ आमदारांनी मंत्री पदाची शपथ घेतली यामुळे सर्वत्र खळबळ माजली.या घटनेचे पडसाद शिंदखेडा तालुक्यात उमटले.

बेटावद गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा परिषद सदस्य ललित वारुडे यांनी या निर्णयाला विरोध करत अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला.अजित दादा पवार यांच्या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची व पक्षाची फरपट झाली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रतींमेचा प्रतिकात्मक पुतळ्याची दुचाकीवरून बेटावद चौफुली ते नरडाणा हायवे पर्यंत एक किलोमीटर पर्यंत दोरीने फरफट केली. आम्ही थोरल्या साहेबांसोबत असून शरद पवार यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी बेटावद जिल्हा परिषद गटातील जवळपास १५० ते २०० युवक दूचाकी रॅलीत सहभागी झाले. यावेळी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य ललित वारुळे, अजय भामरे, पंकज पाटील, सागर निळे, राहुल पवार,कपिल पाटील ,पंकज सोनवणे, गटलू सिसोदे ,मुन्ना सिसोदे, सुनील पवार, मनोज मोरे, विजय पवार, केतन पवार, योगेश चौधरी, आकाश बोरसे ,प्रशांत पाटील अनिल पाटील ,गोलू सोनार ,रोहित पाटील ,सुरज सैंदाणे, यांच्यासह पंचक्रोशीतील कार्यकर्ते उपस्थित होते. शरद पवार यांच्यामागे राहणयचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# संदेश भूमी येथे ३१ जुलै रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन

### कृती समितीतर्फे धम्मदानाचे आवाहन

**धुळे । प्रतिनिधी**

दि. ३१ जुलै १९३७ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार , बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ट्रॅव्हलर्स बंगलो अर्थात संदेश भूमी धुळे येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना येण्यास यंदा ८६ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समिती धुळेच्या वतीने दि. ३१ जुलै २०२३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने सकाळी ९ वाजता पंचशील ध्वजारोहण, महार रेजिमेंट च्या माजी सैनिक व समता सैनिक दल, बहुजन व्हॉलेंटरी फोर्स कडून संदेश भूमीस मानवंदना, सायंकाळी ५ वा.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशाची मिरवणूक ढोल ,ताशा, लाठी काठी, तलवार बाजी, दांडपट्टा, लेझीम यांच्या प्रात्यक्षिकांसह मिरवणूक, तसेच सायंकाळी ५:३० वा. संदेश भूमी येथे शाहीर संभाजी भगत यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम हा मोठ्या प्रमाणामध्ये यंदा साजरा करण्यात येणार असून त्यास मोठा खर्च देखील येणार आहे. म्हणून समाजातील दानशूर व्यक्ती, समाजातील सर्वच धम्मबंधु आणि भगिनींनी मोठ्या प्रमाणात वेळ, बुध्दी, पैसा, श्रम हे धम्मदान रूपी योगदान देऊन कार्यक्रम यशस्वी करावा. येणाऱ्या काळात संदेश भूमी स्मारक महाराष्ट्रात नावारूपास व समस्त बौद्ध व बहुजन समाजाला उपयोगी पडेल यासाठी धम्मदानाचे आवाहन संदेश भूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समितीतर्फे आनंद सैंदाणे यांनी केले आहे.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

# पोलीस निरीक्षक सुनील भाबड यांचा निरोप समारंभ



**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिदखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील भाबड यांची यांची नाशिक ग्रामीण येथे बदली झाल्यानंतर त्यांचा शिंदखेडा पोलीस पाटील संघटनेतर्फे निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी पोलीस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील तर प्रमुख पाहुणे संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ.महेद्र पाटील, भैय्यासाहेब नगराळे, उपस्थित होते.

यावेळी तालुका पोलीस पाटील संघटनेतर्फे पोलीस निरीक्षक सुनील बाबड यांच्या शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी २८ महिने शिंदखेडासाठी उत्कृष्ट कामगिरी बजावून जनता व पोलीस यांच्यामधील एकोपा व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणारे पोलीस निरीक्षक यांची सुनील भाबड यांची बदली झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांनी आपल्या मनोगतातुन आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात करण्यात आला. यावेळी चरणसिंग गिरासे, गणेश गिरासे, प्रदीप गिरासे, युवराज माळी, भैय्यासाहेब नगराळे, सरदार गिरासे, सुरेश पाटील, भूषण राजपूत, संजय खैरनार, निर्णय गिरासे, अनिता पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश गिरासे यांनी केले तर आभार संजय खैरनार यांनी मांनले.

प्रोसस जमा ॲड. श्रीमती. वनिता ए. खैरनार
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, साक्री यांचे न्यायालयात**

**फौ. कि. अर्ज. क. २५८/२०२३**

सुनिल रामदास भदाणे, उ.व.-५५, धंदा-शेती,
रा. सामोडे, ता.साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**
**विरुध्द**
म.ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
कासारे, ता.साक्री, जि.धुळे ... **जाबदेणार**

सुनिल रामदास भदाणे, जन्म दिनांक-०१/०९/१९६८
जन्मस्थळ- कासारे, ता.साक्री, जि.धुळे

ज्या अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात दिनांक १७/०५/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज क. २५८/२०२३ दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म/मृत्यू अधि. १९६९ चे कलम १३(३) व महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी नियम २००० मधील क. ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत साकी न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता दिनांक ०५/०७/२०२३ ही तारीख निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तकार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तकार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा-या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- २३/०६/२०२३

आदेशावरुन
**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय, साक्री** **फौजदारी न्यायालय, साक्री**

प्रोसस जमा ॲड. टी. व्ही.पाटील, साक्री
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १५२/२०२३**

श्री. धनंजय किशोर भावसार व इतर - ३ उ.व.- --, धंदा-शेती,
राहणार पिंपळनेर, भोई गल्ली, ता.साक्री, जि.धुळे ......**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ... सामनेवाला**
मयत - कै. किशोर दगडू भावसार (मृत्यू दिनांक - ०६/१०/२०२२)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०९/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. किशोर दगडू भावसार यांचे दिनांक ०६/१०/२०२२ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. धनंजय किशोर भावसार - मुलगा,
२. श्री. वैभव किशोर भावसार - मुलगा,
३. प्रिया योगेश फुटाणे - मुलगी,
४. रेखाबाई किशोर भावसार - पत्नी,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक २१/०७/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि. ०४/०७/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री,
दिनांक - ०४/०७/२०२३

आदेशावरुन
**क. लिपीक** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

प्रोसस जमा ॲड.श्रीमती. चंद्रकला सी. देवरे
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सा़ो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क. १९३/२०२३**

श्री. गुलाब कोंडाजी बहिरम, उ.व.६५, धंदा-शेती,
रा. माळपाडा, ता.साक्री, जि.धुळे वैगरे ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी वरील न्यायालयात दिनांक ०३/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की, मिराबाई गुलाब बहिरम यांचे दिनांक २२/०५/२०२३ रोजी निधन झाले आहे. मयतांचे मृत्यूसमयी त्यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत-

१. गुलाब कोंडाजी बहिरम - पती
२. संतोष गुलाब बहिरम- मुलगा
३. भारती सुभाष चौरे- मुलगा
४. आशा गुलाब बहिरम- मुलगी
५. अनामिका गुलाब बहिरम - मुलगी

मयतास वरील प्रमाणे वारस असुन त्यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. मयत मिराबाई गुलाब बहिरम यांचे कायदेशीर वारस असलेबाबत घोषित होवुन मिळणेकामी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी मा. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, साक्री यांचे न्यायालयात दिनांक २८/०८/२०२३ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ- साक्री
दिनांक- ०५/०७/२०२३

आदेशावरुन
**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, साक्री** **दिवाणी न्यायालय, साक्री**

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र






गुरुवार, दि. ६ जुलै २०२३

# पवार साहेब आमचे विठ्ठल, मात्र आमच्या विठ्ठलाला बडव्यांचा घेरा: भुजबळ

















मुंबई।
शरदचंद्र पवार साहेब हे आमचे विठ्ठल आहे. मात्र आमच्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरा घातला आहे. त्या बडव्यांमुळे आज आम्ही बाहेर पडलो. आम्ही भाजपात गेलेलो नाही. राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी आणि कार्यकर्ते, पदाधिकारी, नेते यांच्या आग्रहामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी म्हणूनच सत्तेत सहभागी झालो. साहेब तुम्ही आवाज द्या, या बडव्याना बाजूला करा, आपण सत्तेत राहून जनतेचे प्रश्न सोडवू . ज्याप्रमाणे नागालँड मध्ये परवानगी दिली तशी आम्हाला द्या, पोटाशी धरा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली काल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा मेळावा मुंबईतील एमईटी भुजबळ नॉलेज सिटीच्या प्रांगणात पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, मंत्री दिलीप वळसे पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री धनंजय मुंडे, मंत्री धर्मराव बाबा आत्राम, मंत्री अनिल पाटील, मंत्री संजय बनसोडे, मंत्री अदिती तटकरे, माजी विधानपरिषद सभापती रामराजे निंबाळकर, महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार पंकज भुजबळ, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, शिवाजीराव गर्जे, संजय बोरगे यांच्यासह राज्यभरातून आमदार, खासदार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ते म्हणाले की, अनेक लोक आज म्हणत असतील की, भुजबळ सत्तेत सहभागी झाले आता ओबीसींच काय तर मी त्या सर्वांना सांगू इच्छितो की, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे काम हे राज्यात आणि देशात आपण अधिक मजबूत करणार असून ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण कायम लढत राहू असे त्यांनी सांगितले.





# पावसाचा खिशावरही परिणाम ; टोमॅटोचे भाव भिडले गगनाला

















धुळे । राज्यासह देशात मान्सून चांगलाच सक्रिय झाला आहे. यामुळे सर्वसामान्यांच्या खिशावरही परिणाम होताना दिसत आहे. पावसाचा जोर वाढल्यामुळे भाज्यांचे दर वाढले आहेत. आधी उन्हामुळे शेतकऱ्यांची पिकं करपली होती, त्यानंतर अवकाळीनं गोंधळ घातला. आता तर, पावसामुळे पिकांची नासाडी होताना दिसत आहे. परिणामी भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. भाज्यांचे ५० रुपये किलोच्या पुढे आहेत. आलं आणि टोमॅटो विक्रमी किमतीला विकलं जात आहे. महाराष्ट्रातील भंडाऱ्यात टोमॅटो पेट्रोलपेक्षाही महाग आहे. आल्याच्या किमतीनंही रडकुंडीला आणलं आहे. बाजारात कोणतीही भाजी ५० रुपये किलोच्या खाली मिळत नाहीय. टोमॅटोचे दर १०० रुपये किलोच्या पुढे आहेत. महाराष्ट्रातील भंडाऱ्यात टोमॅटो १४० रुपये किलोनं विकले जात आहेत. आल्याच्या किमतीतही प्रचंड वाढ झाली आहे. आलं विक्रमी किमतीला विकलं जात आहे. पाव किलो आलं ८० ते १०० रुपयांना विकलं जात आहे. वाढत्या किमतीमुळे अनेक गृहिणी आलं घेणंच टाळताना दिसत आहेत. यापूर्वी रखरखत ऊन आणि आता मुसळधार पाऊस यामुळे भाज्यांच्या उत्पादनात ७० टक्क्यांनी घट झाली आहे. टोमॅटो, कारलं, भेंडी, भोपळा यासह अनेक भाज्या महागल्या आहेत. मागील महिन्यात टोमॅटोचे दर हे १० रुपये किलोवर पोहोचले होते. त्यानंतर आता देशातील टोमॅटोच्या दरात मोठी वाढ होताना दिसत आहे. महाराष्ट्रातही टोमॅटोचे दर वाढले आहेत. काही भागात हे दर १४० रुपये प्रति किलोवर गेले आहेत. टोमॅटोनं पेट्रोलचे दर मागे टाकल्याची प्रतिक्रिया ग्राहक देत आहेत. यामुळं सर्वसामान्यांचं बजेट कोलमडल्याचं चित्र बघायला मिळत आहे. विदर्भातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे टोमॅटो मे महिन्यापासून बाजार येणं बंद झाले आहेत. परिणामी ग्राहकांची मागणी बघता विदर्भात दक्षिणेतून टोमॅटो आयात केली जात आहेत.